# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार क्र.रामाआ नाशिक/तक्रार क्र.१२१/२०२३/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.गोरख शंकर आहेर,<br>रा.एन४२/व्हीडी-१/२५/३,<br>अष्टविनायक चौक, सावता नगर,<br>सिडको, नाशिक -४२२००८. | तलाठी,<br>तलाठी कार्यालय, देवळा.<br>ता.देवळा, जि.नाशिक. | -- |

राज्य माहिती आयोग
खंडपीठ नाशिक

**विवेचन**

उपरोक्त तक्रारी संदर्भात तक्रारदार यांनी दिनांक २५/०१/२०२३ रोजीच्या तक्रार अर्जान्वये आयोगाने द्वितीयअपिल क्र.२३१८,२३१९ व २३२०/२०१९ या तीन द्वितीय अपिलांसंदर्भात दि.०१/०८/२०२२ रोजी सुनावणी घेवून एकत्रित आदेश पारित केले आहेत. सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा तलाठी, देवळा यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली असून माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, देवळा यांच्याविरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) नुसार कारवाई करावी अशी विनंती केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयोगासमोर दि.२३/०२/२०२४ रोजी सुनावणी होऊन आयोगाने खालीलप्रमाणे आदेशित केले होते.

आयोगाने द्वितीय अपिल क्र.२३१८,२३१९ व २३२०/२०१९/नाशिक संदर्भात दि.०१/०८/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत दिलेल्या आदेशातील मुद्दा क्र.१ ची अंमलबजावणी केली नाही म्हणून त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) नुसार शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा दि.०१/०८/२०२२ रोजी कार्यरत असणारे जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक यांनी आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास याप्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन त्यांच्याविरुध्द शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. सदर आदेशास अनुसरुन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक श्री.उमेश रमेश गोपनारायण यांनी दि.२८/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये लेखी खुलासा आयोगास सादर केला आहे. सदर खुलाशात त्यांनी असे नमूद केले आहे की, अर्जदार श्री.गोरख शंकर आहेर यांनी दि.१९/०३/२०१९ रोजी माहिती अधिकारात निवासी नायब तहसिलदार देवळा यांचे आदेश क्र.तर जमा/कावि/८२४/२०१६ दि.२२/१२/२०१६ चे तक्रार रजिस्टरप्रमाणे दि.३०/१२/२०१६ रोजी नोंद प्रमाणित करतांना जुन्या विहिरीचा व ओहोळाला लागून रस्त्याच्या व जागेवरचा स्थळ परिक्षणाच्या पंचनाम्याची प्रत मागणी केलेली आहे. याबाबत नोंद प्रमाणित करतेवेळी कुठलाही जुन्या विहिरीचा व ओहोळाला लागून रस्त्याच्या व जागेवरचा स्थळ परिक्षणाचा पंचनामा झालेला नसल्यामुळे सदर पंचनाम्याची प्रत कार्यालयात उपलब्ध नाही. परंतू अर्जदार यांना निवासी नायब तहसिलदार देवळा यांचे आदेश क्र.तर जमा/कावि/८२४/२०१६ दि.२२/१२/२०१६ चे तक्रार रजिस्टरची पूर्ण नक्कल देण्यात आली आहे. तसेच खरेदी दस्त क्र.१३७/१९६७ दि.०२/०२/१९६७ अर्जदार यांना दिलेला आहे.

अर्जदार श्री.गोरख शंकर आहेर यांनी माहिती अधिकारात मौजे देवळा येथील गट नं.१२१६/१ च्या ७/१२ ला १२९१५ ची नोंद करतांना दि.०५/०८/२०१६ रोजी संमतीपत्रावर स्वाक्ष-या घेण्यात आल्य. नामदेव दत्तू आहेर त्यांचे वारस श्री.हरी आहेर व श्री.माधव आहेर यांची संमती व स्वाक्षरी देतांना घेतलेल्या त्यांच्या फोटो ओळखपत्राची प्रत याची मागणी केली आहे. त्यानुसार ७/१२ ला १२९१५ ची नोंद करतांना दि.०५/०८/२०१६ रोजी खरेदी देणार नामदेव दत्तू आहेर हे मयत असल्याने त्यांचे वारस नातू हरी आहेर व माधव आहेर यांना त्यांचे आजोबाने दिलेली खरेदी ही सत्य आहे किंवा कसे याबाबत महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५०/२ प्रमाणे नोटीस देणे बंधनकारक असल्याने नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीसवर सदर वारसांनी स्वाक्षरी करतांना किंवा संमती देतांना त्यांचे कुठलेही फोटो काढण्यात आले नव्हते किंवा ओळख म्हणून त्यांच्या दाखवलेल्या ओळखपत्राची प्रत दप्तरी दाखल करुन घेण्यात आली नव्हती. त्यामुळे सदर कागदपत्र कार्यालयात उपलब्ध नसल्याने माहिती अधिकारात उपलब्ध करुन देता येत नाही.

अर्जदार श्री.गोरख शंकर आहेर यांनी माहिती अधिकारात मौजे देवळा येथील गट नं.१२१६/१ च्या ७/१२ ला १२९१५ नोंद केली त्या गट नं.१२१६/१ वरील दिनांक ०२/०२/१९६७ रोजी श्री.शंकर बापू पाटील यांनी खरेदी केला या खरेदी खताची प्रत मागणी केली आहे. त्यानुसार खरेदी दस्त क्र.१३७/१९६७ दि.०२/०२/१९६७ दुय्यम निबंधक कळवण कडे झालेले खरेदी खत हे तत्कालीन सर्व्हे नं.५६९ व आजचा गट नं.१२३१ तसेच तत्कालीन सर्व्हे नं.५६०/२ व आजचा गट नं.१२१६ यावर खरेदी घेणार भागा संपत आहेर व खरेदी देणार नामदेव दत्तू आहेर यांचेत झालेले आहे. श्री.शंकर बापू पाटील हे त्यावेळी सदर जमिनीचे मालक नव्हते म्हणून त्यांचे नावे खरेदी खत नाही. तसेच १९६७ साली जमिनीचा ७/१२ म्हणून सर्व्हे नं. पध्दती अस्तित्वात होती नंतर १९७२/७३ साली गटस्कीम अस्तित्वात येऊन गट नंबर अस्तित्वात आले. त्यामुळे गट नं.१२१६ हा १९६७ साली अस्तित्वात नसून ५६०/२ हा सर्वे नंबर अस्तित्वात होता त्यामुळे गट नं.१२१६ या गट नंबरचा उल्लेख करुन त्यावर असलेले ०२/०२/१९६७ चे शंकर बापू पाटील यांचे नावाचे खरेदीखत नसल्याने ते उपलब्ध करुन देता येत नाही. अर्जदार यांनी मागितलेल्या माहितीप्रमाणे कार्यवाही करुन दिलेली आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या कामात कोणत्याही प्रकारची टाळाटाळ केलेली नाही. तरी प्रतिवादी यांचेवर कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये अशी विनंती केली आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

३. प्रस्तुत तक्रारीसंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक श्री.उमेश रमेश गोपनारायण यांनी आयोगाने द्वितीय अपिल क्र.२३१८,२३१९ व क्र.२३२०/२०१९/नाशिक संदर्भात दि.०१/०८/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार तक्रारदार श्री.गोरख शंकर आहेर यांना त्यांच्या दि.१९/०३/२०१९ रोजीच्या तीनही माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी काहीही कळविले नसून दि.०२/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संबंधित कागदपत्रे आढळून येत नाही असे कळविल्याचे दिसून येते. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार तक्रारदार यांना अवलोकनासाठी बोलाविणे आवश्यक होते परंतू अशी कार्यवाही त्यांनी केलेली नसून पूर्वी कळविल्यानुसार पुन्हा तेच उत्तर दिले आहे. तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी हे द्वितीय अपिलाच्या तसेच तक्रारीच्या सुनावणीवेळी आयोगासमोर उपस्थित देखील नव्हते आणि अनुपस्थितीबाबत त्यांनी कोणताही ठोस खुलासा आयोगाकडे सादर केलेला नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक यांनी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केलेली नसून तक्रारदार यांना माहिती देण्यास अथवा माहितीपासून वंचित ठेवण्यास टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. याव्यतिरिक्त तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे कोणताही लेखी खुलासा अद्याप आयोगाकडे सादर केलेला नसल्यामुळे त्यांचे याप्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) नुसार शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. याव्यतिरिक्त आयोगाने प्रस्तुत तक्रारीसंदर्भात दि.२३/०२/२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा ता.देवळा,

जि.नाशिक यांनी देखील अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याबाबत त्यांच्या लेखी खुलाशासोबत कोणतेही कागदपत्रे पुरावा म्हणून सादर केलेले नाहीत. यावरुन त्यांनी देखील आयोगाच्या दि.२३/०२/२०२४ रोजीच्या आदेशानुसार तक्रारदारास माहिती पुरविली नाही म्हणून त्यांच्याविरुध्द देखील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) नुसार शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक यांनी आयोगाकडे कोणताही खुलासा सादर केलेला नसल्याने उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगाच्या मते त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम तहसिलदार, तहसिल कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक यांनी दि.०१/०८/२०२२ रोजी कार्यरत असणारे जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक श्री.उमेश रमेश गोपनारायण यांनी आयोगाकडे सादर केलेला खुलासा अमान्य करण्यात येत असून उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगाच्या मते त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम तहसिलदार, तहसिल कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक यांनी दि.०१/०८/२०२२ रोजी कार्यरत असणारे जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

३) प्रस्तुत तक्रार अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**( भूपेन्द्र गुरव )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :- 06 NOV 2024

---

प्रति,

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक.

---

प्रत,

तहसिलदार, तहसिल कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक यांना उपरोक्त आदेशानुसार माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

---

जावक क्र.रामाआ नाशिक/तक्रार खुलासा क्र.१२१/२०२३/नाशिक/ओ- 324e , दिनांक :- 06 NOV 2024